पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**<u>कार्यपत्रिका क्रमांक ३५</u>**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. १/१२/२०२०** रोजी सकाळी ११:०० (अकरा) वाजता **<u>स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे दृक श्राव्य (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) द्वारे भरेल.</u>**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**<u>वृत्तांत कायम करणे.</u>**

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. ७५९**

मा.सौ.दिपाली धुमाळ, विरोधी पक्षनेता यांचे दि.१९/११/२०२० चे पत्र.

पुणे महापालिकेने मिळकत करावरील दंडातील रकमेत ८० टक्के सूट देणेची अभय योजना राबविली असून त्याची मुदत ३१ नोव्हेबर २०२० आहे. या योजनेस चांगला प्रतिसाद मिळत आहे. यावर्षी कोरोनाचा वाढता संसर्ग, लॉकडाऊनची पार्श्वभूमी पाहता अनेक व्यवसाय ठप्प झाले आहेत. तसेच नोकरी गमावण्याचे प्रमाण देखील वाढलेले आहे. अनेक नागरिकांना त्यांचे उत्पन्न ठप्प झाल्याने अभय योजनेचा लाभ घेता आला नाही.

सबब पुणे महापालिकेच्या मिळकत कराची अभय योजनेचा कालावधी एक महिना वाढवून ३१ डिसेंबर २०२० पर्यंत करण्यात यावा.

**संकीर्ण**

**विषय क्र. ७६०**

पुणे महानगरपालिका परिमंडळ क्र.३ अंतर्गत सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाचे अंतर्गत सिंहगड इन्स्टीट्युटचे मुलांचे वसतीगृह इमारत रायगड, पन्हाळा व मुलींचे वसतीगृह ए,बी,सी, पोकळे शाळा येथे स्थापित केलेल्या आयसोलेशन/ क्वारंटाईन /CCC केंद्रासाठी दररोज दाखल होणाऱ्या नागरिकांना दैनंदिन सकाळी व दुपारी चहा, नाश्ता, दुपारचे व सायंकाळचे जेवण, लहान मुलांसाठी दुध व बिस्कीटे , गरजेनुसार बिस्लेरी पाणी बॉटल पुरविणे इत्यादी कामे १) मे.मॉर्डन केटरर्स, २) मे.रुचिरा केटरर्स, ३) मे.कॅफे साईलिला, ४) मे.एस.पी.कन्स्ट्रक्शन या एजन्सी कडुन दि.१२/०४/२०२० पासुन आणि स्थापत्य विषयक कामे मे.एस.पी.कन्स्ट्रक्शन यांचेकडुन सन २०१९-२० च्या शेड्युल मान्य दराने व सदरचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७(३)(क) अन्वये केलेल्या खर्चाची माहिती मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभा पुणे म.न.पा. यांच्याकडे माहितीसाठी व अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.३/४४० दि.२३/११/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ७६१**

सन २०२०-२१ या वर्षात(मोबाईल टॉवर वगळून) मिळकत करावरील शास्तीवर / व्याजावर अभय योजना लागू करताना मा. स्थायी समिती ठराव क्र.५५५ दिनांक २४/०९/२०२० मधील मुद्दा क्र. ४ याचा विचार सन २०२१-२२ चे कर निर्धारणाचे वेळी करण्यास मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/टीजीओ/४४१ दि.२३/११/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ७६२**

पुणे महानगरपालिका परिमंडळ क्र.३ अंतर्गत सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाचे अंतर्गत सिंहगड इन्स्टीट्युटचे मुलांचे वसतीगृह इमारत रायगड, पन्हाळा व मुलींचे वसतीगृह ए,बी,सी, पोकळे शाळा येथे स्थापित केलेल्या आयसोलेशन/ क्वारंटाईन /CCC केंद्रासाठी दररोज दाखल होणाऱ्या नागरिकांना दैनंदिन सकाळी व दुपारी चहा, नाश्ता, दुपारचे व सायंकाळचे जेवण, लहान मुलांसाठी दुध व बिस्कीटे , गरजेनुसार बिस्लेरी पाणी बॉटल पुरविणे इत्यादी कामे १) मे.मॉर्डन केटरर्स, २) मे.रुचिरा केटरर्स, ३) मे.कॅफे साईलिला, ४) मे.एस.पी.कन्स्ट्रक्शन या एजन्सी कडुन दि.१२/०४/२०२० पासुन आणि स्थापत्य विषयक कामे मे.एस.पी.कन्स्ट्रक्शन यांचेकडुन सन २०१९-२० च्या शेड्युल मान्य दराने व सदरचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७(३)(क) अन्वये केलेल्या खर्चाची माहिती मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभा पुणे म.न.पा. यांच्याकडे माहितीसाठी व अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.३/४४२ दि.२३/११/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ७६३**

परिमंडळ क्र.३ सिंहगड रोड क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील कोरोना प्रतिबंधात्मक योजनेकरिता विलगीकरण कक्ष (कै.वस्ताद हरिभाऊ पोकळे प्राथमिक शाळा, धायरी, पुणे, कै.सिताराम नारायण गावडे प्राथमिक शाळा, जनता वसाहत, पर्वती, पुणे)व कोव्हिड केअर सेंटर(सिंहगड कॉलेज मुलांचे वसतीगृत - रायगड, पन्हाळा, मुलीचे वसतीगृह ए-पायास्वामी, बी-यमुना, सी-गोदावरी) येथे दर्शनीभागात पत्रा मांडव करणे व इमारतींच्या आतील मोकळ्या जागेत पत्रा पार्टीशन, कपडा पार्टीशन, गाद्या पुरविणे अशा स्वरुपाची कामे पुणे म.न.पा.कडील ठेकेदार मे.जगन्नाथ मंडप डेकोरेटोर (प्रो.प्रा. श्रीमती पुजा मच्छिंद्र लांडगे) यांचेकडुन सन २०१९-२० चे शेड्युल मान्य दराने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम नं.६७(३)(क) अन्वये केलेल्या खर्चाबाबतची माहिती मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभा पुणे म.न.पा. यांच्याकडे माहितीसाठी व अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.३/४४३ दि.२३/११/२०२० चे पत्र.

**प्रभारी नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**

**सुचना - कोरोना विषाणूमुळे उद्भवलेली परिस्थिती विचारात घेवून मे.केंद्र व राज्य शासनाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे ही विनंती. व्हिडीओ कॉन्फरन्सींगची लिंक आपणास व्हॉट्सअॅप द्वारे कळविण्यात येईल.**